जलसंपदा विभागांतर्गत खरेदी सल्लागार समिती (अ) च्या जागी राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती गठीत करणे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. समिती-०११६/(प्र.क्र.२१/२०१६)/यांत्रिकी
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३ फेब्रुवारी, २०१६.

वाचा: १) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र. एमसीएन-११८४/(६७/८४)/पीआरजे-१, दिनांक १० मार्च, १९८४.
२) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५.

प्रस्तावना -

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाकडील विविध यंत्रसामुग्री, उपकरणे आणि भांडार साहित्य खरेदीबाबत त्यांचे वर्ग “अ” ते “इ” मध्ये वर्गीकरण करुन त्यांच्या खरेदीबाबत खरेदी सल्लागार समित्यांची स्थापना करण्यात आली होती.

उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ३०.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका प्रसिध्द केली आहे. सदर नियम पुस्तिकेच्या परिच्छेद क्र. २.९.२ मध्ये नमूद केल्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांना खरेदी प्रक्रिया पार पाडता यावी, यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभाग/कार्यालयांतर्गत खरेदी समिती गठीत करावयाची आहे. त्यामुळे खरेदी सल्लागार समिती (अ) च्या जागी राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती गठीत करणे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

शासन निर्णय -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये प्रसिध्द केलेल्या नियमपुस्तिकेत विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार खरेदी प्रक्रिया हाती घेण्यासाठी जलसंपदा विभागासाठी खरेदी सल्लागार समिती (अ) च्या जागी खालीलप्रमाणे **राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती** गठीत करण्यात येत आहे :-

१	प्रधान सचिव (जलसंपदा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	:	अध्यक्ष
२	मुख्य अभियंता (द व प्र) तथा सह सचिव, मंत्रालय, मुंबई	:	सदस्य
३	मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक	:	सदस्य
४	आंतरवित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	:	सदस्य
५	उप सचिव (मो.प्र.१), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	:	सदस्य सचिव
६	सहाय्यक संचालक (लेखा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	:	निमंत्रित
७	उद्योग सह संचालक (भांख) / उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी	:	निमंत्रित

३. नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.९.२ मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावयाच्या बाबीसंदर्भात सर्व निर्णय उक्त समितीला घेता येईल. जर खरेदीचे अंदाजित मुल्य रु. १०,००,०००/- पेक्षा कमी (रुपये दहा लाखापेक्षा कमी) असेल तर, प्रशासकीय विभाग प्रमुख तथा अध्यक्ष राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती यांना खरेदी संबंधी उक्त खरेदी समितीची बैठक न बोलविता निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१६०२०३१६५८००६४२७ असा आहे हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नांवाने,

Ravindra Eknath Upasani

Digitally signed by Ravindra Eknath Upasani
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=919ca5631d5e5e1e72afb963a89d301a113ab3a7e58e66215bbd84052a32b8cf, cn=Ravindra Eknath Upasani
Date: 2016.02.03 16:57:59 +05'30'

(र. ए. उपासनी)
उप सचिव , महाराष्ट्र शासन,
जलसंपदा विभाग.

प्रति,

१) मा. मंत्री (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. राज्यमंत्री (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
६) सचिव, लाभ क्षेत्र विकास, जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
८) महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) संचालक, लेखा व कोषागारे, प्रशासकीय इमारत, मुंबई.
११) संचालक, उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
१४) मुख्य अभियंता (यांत्रिकी), नाशिक.
१५) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
१६) मुख्य अभियंता (द. व. प्र.) व सह सचिव यांचे स्वीय सहायक.
१७) उप सचिव (मो.प्र.१) यांचे स्वीय सहायक.
१८) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
१९) आंतरवित्त सल्लागार व उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
२०) सहायक संचालक (लेखा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) उद्योग सहसंचालक (भां खं) नविन प्रशासकीय भवन, ३ रा मजला, मंत्रालय समोर, मुंबई
२२) यांत्रिकी कार्यासन संग्रहार्थ.